NATIONAL CONFERENCE ISBN No: 978-93-80744-48-3

Gokhale Education Society's
RNC Arts, JDB Commerce & NSC Science College - Nashik Road.

Affiliated to University of Pune
ISO 9001:2008 Certified
NAAC reaccredited 'B' Grade

Ph.Off.: (0253) 2461548
Fax No.: (0253) 2469342
Website :- www.cbcnashikroadcollege.com
E-mail : cbcnashikroadcollege@gmail.com

# CONFERENCE PROCEEDINGS

## E-JOURNAL

National Conference on

# Contribution of Sant Sahitya (Saint Literature) to Indian Culture

28th & 29th December, 2013

**Conference Director & Editor-in-Chief**
Prin.Dr. R M Kulkarni

**Executive Editor**
Shyaonti Talwar

**Editorial Committee**
Dr. Chitra Mhalas
Vilas Khambait

Opp: Birla Mandir, Nashik-Pune Road, Nashik Road. 422101.
(Maharashtra) Off. Ph. No. 0253-2461548 Fax No. 0253-2469342

Contribution of Sant Sahitya (Saint Literature) to Indian Culture

ISBN: 978-93-80744-48-3

## A Two Day National Conference

## Session: IV

- Literary Aspects Saint Literature
- Saint Literature and Indian Philosophy
- Environment Conservation

INDEX


| Paper No. | Title of the Paper | Name |
|---|---|---|
| 1. | नैतिक मूल्यांची शिकवण देणारे संत वाड्.मय | डॉ. वेदश्री विजय थिगळे, |
| 2. | Impact of Teachings in Saint Literature on Indian Culture | Dr.Smt. Anjali A. Gautam |
| 3. | संत साहित्य आणि जीवनमूल्ये | डॉ. वैजयंतीमाला जाधव.भोसले |
| 4. | The Massage of environment conservation in saint literature | Dr.Shri. Suresh K Shelar<br>Shri. Sachin R Govardhane |
| 5. | ज्ञानेश्र्वरीतील अभिरूची संपन्नता | डॉ.श्रीमती. चित्रा म्हाळस |
| 6. | संत ज्ञानेश्वर, संत नामदेव, संत एकनाथ आणि संत तुकाराम यांच्या वाङमयातील गुरुभक्ती | श्रीमती. प्रज्ञा श्री. कुलकर्णी |
| 7. | संत तुकारामांच्या अभंगगाथेतून व्यक्त होणारी पर्यावरणीय जाणीव | डॉ.श्रीमती.सिंधू नंदकुमार भंगाळे |
| 8. | संत तुकारामांच्या अभंगातून व्यक्त होणाऱ्या पर्यावरण विषयक जाणिवा | श्री. महादेव अंगद जगताप |

ISBN: 978-93-80744-48-3

# संत साहित्य आणि जीवनमूल्ये

डॉ. वैजयंतीमाला जाधव.भोसले
मॉडर्न महाविदयालय, पुणे,
८३०८८३९३३७

मध्ययुगीन महाराष्ट्रीय जीवन धर्माशी निगडित होते. इ. स. १०२७ पासून औरंगजेबाच्या कालखंडापर्यंत अनेक मुस्लिम सत्ता येथे कार्यरत होत्या. इ. स. ११९७ ते १३१८ या यादवराजांच्या कारकीर्दीत महाराष्ट्राने संपन्न दिवस पाहिले. हा १०० वर्षांचा यादवकाळ समृध्द असला तरी तो धर्मप्रधान होता. कर्मकांड, रूढी यांचे प्राबल्य वाढले होते. समृध्दतेमुळे समाज अंधश्रध्देकडे अधिकच झुकत होता

नानप्रकारची व्रतवैकल्ये, जपतप, यज्ञयाग यांचे स्तोम माजले होते. तीर्थयात्र, दानधर्म या बरोबरच जुगारालाही मानाचे स्थान होते. या काळात वर्ण, कर्म, गुण, स्पृश्यासृक्ष्य, ओवळे, सोवळे, ब्राम्हण, शुद्र, मोक्ष अशा गोष्टींना अत्यंत महत्त्व प्राप्त झाले होते. या कालखंडातील हेमाड पंडिताचा चतुवर्ग चिंतामणी ही ग्रंथ याची साक्ष आहे. या ग्रंथात व्रत, दान, तीर्थ, मोक्ष याबद्दल सविस्तर माहिती आहेत. एकूण दोन हजार व्रते त्यात सांगितलेली आहेत. अशा परिस्थित संतांनी केलेले कार्य हे महत्त्वाचे आहे. या काळात ढोंगी आणि कर्मकांडी लोकांची तसेच हरिदास, पुराणिक, गोसावी यांची संख्या वाढली होती.

या काळात वारकरी संप्रदायाने केलेले कार्य महत्त्वपूर्ण आहे. भक्तिमार्ग हा ज्ञानेश्वर–नामदेव–तुकाराम यांच्याकडून महाराष्ट्रास प्राप्त झालेली जीवननिष्ठा आहे. ब्रम्हं सत्यं जगान्मिथ्या हा शंकराचार्यांचा मायवाद ज्ञानेश्वरांनी 'अद्वैतवाद' मोडून खंडून काढला. 'सर्व खल्विदं ब्रह्म्' या उपनिषद्प्रणीत अद्वैत मताचे ज्ञानेश्वर हे पुरस्कर्ते ठरतात. परब्रह्म् आणि जग–सृष्टी हे माती व घर, कापूस व वस्त्र, सागर व लाटा याप्रमाणे एकरूप आहे; दृश्य, दुष्टा आणि दर्शन या पलीकडे असणारा परमात्मा हाच स्वतः विश्वरूप आहे. असा विचार ज्ञानेश्वरांनी मांडला. त्यामुळे कर्मकांड, मोक्ष अशा गोष्टीमागे धावणारा समाज जागृत होऊ लागला. भक्तियुक्त अंतःकरणाने केलेली कर्मे परमेश्वराला अर्पण करावयाची म्हणजे कर्मही शुध्द आणि पवित्र हवे हे नीतिशास्त्रही त्यात आले. नामस्मरण हे अखंड भक्ती अनुभवायाचे साधन आहे. विठ्ठल भक्तांचा आचारधर्म साधा सरळ आहे. दया–क्षमा–शांती यांची उपासना परनिंदा, परद्रव्या–परंपरा–परपीडा या गोष्टींचा त्यांनी निषेध केला. उच्चनीच ही भेदाभेद नाही.

संताची जीवनमूल्ये ही जनसामान्यांना पटणारी होती. संत नामदेवांनी सर्व प्रथम भक्ताला उद्देशून संत या शब्दाचा वापर केलेला दिसतो.

जे खंडावया घावो घाली।
का लावणी जयाने केली।
दोघां एकचि साऊली। वृक्ष दे जैसा
(ज्ञानेश्वरी अध्याय १२ वा, ओवी क्र. १९९)

अशा समत्वा आणि ममत्वाचा भावनेने संत सर्वांवर सारखेच प्रेम करतात. कर्मकांड, व्रतवैकल्ये, संन्यास, यज्ञयाग यांचा त्याग करून प्रत्येक जीवमात्रास ईश्वर मानणारी मानवता त्यांनी जपली.

संताच्या वाणीत असणाऱ्या उपदेशाचे प्रबोधनाचे स्वरूप सामाजिक आहे. जातीयता, जन्माधारे येणारी विषमता, कर्मकांड, अंधश्रध्दा, यज्ञयाग याविषयी समाजाला योग्य दिशा देणारे विचार संत वाङ्मयात आढळतात. एका देहाचि वीण। तेथे कैचे भिन्नाभिन असा विचार संत मांडतात. संताच्या विचारामुळे सामान्य

ISBN: 978-93-80744-48-3

माणसालाही परमोच्च पदाला पोहोचण्याची संधी प्राप्त झाली. माणसाने परदारा, परधर, परनिंदा, परपीडा यांच्या मागे जाऊ नये. संत सज्जनांची संगत धरून विठाबाचे गोड नाम स्मरावे. सर्वांभूती समभाव जपावा. याकरिता काही वेगळी साधने लागत नाहीत. लोकांनी निंदा कली. तरी सज्जन माणसाने त्याचा राग करू नये. निंदा–स्तुती, शत्रु–मित्र ज्याला समान वाटतात. तोच सर्वांना अथातच देवाला आवडतो. अशा सज्जनास माती आणि सोने समानच वाटणार. समाजातील अशी संत सज्जन माणसे म्हणजे एक मूल्यवान ठेवा असतो, तिन्ही लोकांत पावन होणारा तो एक योगीराज असतो.

सामान्य माणसांचा देव–धर्म याबाबत अनेकदा गोंधळ होत असतो. त्याच्या अवतीभोवती वेगवेगळे विचाार देणारे लोक असतात. अंधश्रध्दाचे प्रमाण समाजात वाढत जाते. अशा वेळी सामान्य लोकांना योग्य तो मार्ग दाखविण्याची जबाबदारी संतांवर होती. केवळ उपदेश न करता प्रत्यक्षात कृतीद्वारे हे काम संतानी पार पाडले. चित्तशुध्दी, मनशुध्दी यांना संतानी महत्त्व दिले. ज्ञानदेवांनी सर्वसामान्य लाकांना सम्यक् ज्ञान होण्यासाठी मराठी भाषेत भगवद्‌गीतेवर भाष्य केले तर नामदेवांनी कीर्तनाच्या आधारे ज्ञानदीप लावण्याचे कार्य केले.

"ज्ञानदेव–नामदेवानंतर दोन अडीच शतकांनी जरा अनुकूल काळ येताच 'ज्ञानाचा एका' व 'नामाचा तुका' यांनी ज्ञानी ज्ञानदेव–नामदेवांच्या उपदेशात कालानुरूप आणि स्वभाव धर्माप्रमाणे मूळ स्वरूपाला धक्का न लावता थोडी भर घालून भागवत धर्मप्रसाराचे कार्य पुढे चालविले. नामदेवांच्या काळी 'दया, क्षमा, शांती' चा मोघम उपदेश होत होता. पण एकनाथांनी भागवताबरोबर रामायणही लिहिले आणि तुकोबांनी 'दया तिचे नाव भूतांचे पालन। आणिक निर्दालन कटकांचे' अशी दयेची व्याख्या स्पष्ट केली आहे."

(पेंडस शं. दा. : ज्ञानदेव आणि नामदेव.पृ.४५३, १९९८)

ज्ञानदेव आणि नामदेव, एकनाथ आणि तुकाराम या संतानी मध्ययुगामध्ये जनसामान्यांना जी शिकवण दिली ती अत्यंत मोलाची आहे. संतानी लोकांना साध्या सोप्या भाषेतून जगण्याचे हे तत्वज्ञान पटवून दिले. समाजमनाला वळण लावण्याचे आणि त्यांच्यातील दोषनिवारणाचे महत्त्वाचे काम संतांनी केले. यादवकालानंतर सुमारे साडेतीनशे वर्षे खरे तर महाराष्ट्रात अंधारयुगच होते. या काळात संतसाहित्याने जनसामान्यांच्या मनात भक्तिची ज्योत तेवत ठेवून मनÁशुद्धीचे उत्तम आचारधर्म देण्याचे मोलाचे काम केले. लोकमानसाची जडणवडण करण्याचे कठीण काम या जीवनमूल्यांनी केले.

१९६० नंतरच्या कवितेमध्ये मनोहर ओकांची कविता आशयद्रव्य आणि अभिव्यक्ती पद्धतीच्या बाबतीत वेगळी ठरते. स्वतःचे अस्तित्व, कलावंत म्हणून 'स्व' ची निर्मितीप्रक्रियेत असलेली गुंतवणूक आणि या गुंतागुंतीच्या जगण्यात 'मी' ला पडत असलेले प्रश्न या अनेकविध सुत्राभोवती ओकांची कविता फिरताना दिसते. कवी आपल्या अस्तित्वाबाबत अतिशय सावध आहे. रोजच्या गुंतागुंतीच्या वर्तमानाला तोंड देत असतानाच भविष्याचे प्राक्तन काय असावे हा प्रश्न त्याला सतत पडत राहतो. वर्तमानाला प्रतिक्रिया देत असणारा 'मी' आणि त्यानंतरच्या येणाऱ्या क्षणाला तोंड देणारा 'मी' असे दोन भिन्न काळांमध्ये 'मी' चे जगणे प्रस्तूत कवितांमधून अधोरेखित केले आहे. 'मी' कोण आहे? माझे जगण्याचे प्रयोजन काय? या अस्वस्थतेमधून निर्माण होणारी प्रश्नांकितता यातून ही कविता आकार घेताना दिसते.

स्वतःच्या अस्तित्वाबाबत, जगण्याबाबत कवितेतील 'मी' ला अनेक प्रश्न पडतात. जन्म आणि मृत्यू या दोन अवस्थांतराबद्दल त्याला मोठी उत्सुकता आहे. माणसाचा मृत्यू, त्याचे गूढ रूप याबद्दल कवितागत 'मी' च्या मनात प्रचंड आकर्षण आहे. सध्या अटळपणे माझ्या वाट्याला आलेले जगणे आणि त्यानंतरच तितक्याच अटळपणे येणारा मृत्यू हा कसा असेल? हा प्रश्न त्याला पडतो आहे. या मृत्यूच्या गूढतेचा घेतलेला शोध या कवितेतून दिसून येतो आहे. रोजच्या वर्तमानाला सामोरे जात असताना जगण्यातील मूल्यांची होणारी पडझड, जगण्यातील दुःख हे सारं नष्ट होऊन हे 'देठ' सुटावेत असा एक सूर सतत कवितेतून ऐकू येतो आहे.

'मी' जगत असलेला 'काळ' हा अशाश्वत आहे. या काळातील प्रत्येक गोष्ट, जशी की झाडी, झुडपं, अगदी माणसंही दिखावटी आणि क्षणभंगुर आहे. मग या जगण्यात मूल्ययुक्त, शाश्वत काही आहे का? हे शोधत हा 'मी' निघाला आहे. पण तसही काही या 'मी' च्या हाती लागत नसावं. कारण तो अखेर

*सॅक्सॅफोनी*
*टॉम डिक अॅन्ड सोनी*
*माला, मंजुळा आणि सोनी*

२५

*झोपेतल्या दुःखस्वप्नासारखं*
*अस्तित्व*
*नाशाबित*

याच अवस्थेप्रत येतो. एका बाजूला या शाश्वत मूल्यव्यवस्थेच्या शोधात निघालेला 'मी' त्याच्या निर्मितीप्रक्रियेच्या बाबतीत अत्यंत सतर्क आहे. कलावंत म्हणून त्याचे जगणे हा त्याचा श्वास आहे. आणि हे निर्मितीप्रक्रियेचे चक्र गतिमान असणे हेच त्याच्या अस्तित्वाचे द्योतक आहे. या प्रक्रियेमध्ये खंड पडणे म्हणजेच त्याच्या अस्तित्वाला धक्का देण्यासारखे आहे. कारण निर्मितीप्रक्रियेशिवाय कलावंताचे शरीररूपाने असणे हे व्यर्थ आहे. अशा स्वरूपाने जगणे हा एक प्रकारचा शापच म्हणावा लागेल हा शाप भोगताना 'मी' स्वतःपासून तोंड लपवत दूर जाऊ पाहतो आहे. हे निर्माणचक्र थांबणे इतके भयानक आणि सुन्न करणारे आहे की,

*खोल सुन्न श्वास अंगावर*
*धरतात, निळी निरास खपली*

या निर्मितीप्रक्रियेचा मोहोर जर आटून गेला तर मग नवनिर्माणाची पालवी आणि कळीच्या शक्यताच मिटून जातात. अशावेळी मग हे थांबलेपण संपवून हे चक्र गतिमान करण्यासाठी अनेकविध नवीन शक्यतांचा अवलंब करण्याची गरज आहे. कारण तोचतोचपणा काही कंटाळवाणा आहे, फक्त ते 'submission' चे एक नवे रूप आहे. पण आताचे थांबणे हा अपूर्णविराम आहे. कदाचित या एका विशिष्ट काळापुरती ही प्रक्रिया रेशमी किड्याप्रमाणे सुप्तावस्थेत गेली असेल. त्यामुळे या एका क्षणानंतर अपूर्णविराम संपून पुन्हा तिला गती लाभण्याची दाट शक्यता आहे. कारण कलावंताची निर्मितीची प्रक्रिया ही फक्त काही काळासाठी थांबली आहे. त्यांच्या वातावरणात एखादा शब्द गेला तर स्फोट होईल एवढी भाषिक सर्जनक्षमता त्याच्या अंगी आहे. जास्त काळ स्थानबद्धतेत स्तब्धरूद्धपणे बसणे हे कलावंताच्या गोठलेपणाचे निदर्शक आहे. पण सर्जनक्षमतेचे बहुवचनी गुलाब फुलतील असा अशावादी ध्वनी याठिकाणी ऐकू येतो आहे.

हे सगळे निर्मितीप्रक्रियेचे चक्र ज्या माध्यमातून आकार घेते ते म्हणजे भाषेचे माध्यम. कवितेची भाषा ही